मुख्यमंत्री सुकर्मी पुरस्कार योजनेबाबतच्या मार्गदर्शकपर सूचना.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांकः एसआरव्ही-२०१६ /प्र.क्र.४३२/कार्यासन १२
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
तारीख : ०८ मे, २०१८

वाचा :- या विभागाचा समक्रमांकाचा दि. २०.०३.२०१८ चा शासन निर्णय,

शासन निर्णय :-

संदर्भाधीन शासन निर्णयाद्वारे मुख्यमंत्री सुकर्मी पुरस्कार योजना हा नवीन उपक्रम कार्यान्वित करण्यात आला असून, सदर पुरस्कार योजनेची अंमलबजावणी चालू आर्थिक वर्षापासून सुरू करण्यात आली आहे. मंत्रालय स्तरावर या योजनेच्या अंमलबजावणीच्या वेळी प्रशासकीय विभागांना आलेल्या अडचणी विचारात घेऊन खालीलप्रमाणे मार्गदर्शनपर सूचना या शासन निर्णयाद्वारे निर्गमित करण्यात येत आहेत.

(अ) मंत्रालय स्तरावर तसेच क्षेत्रीय स्तरावर या योजनेच्या अंमलबजावणीसाठीच्या मार्गदर्शकपर सूचना:-

१) ज्या आर्थिक वर्षासाठीचे उद्दिष्टनिष्ठ व व्यक्तिनिष्ठ गुणांकन करावयाचे आहे, त्या आर्थिक वर्षी संबंधित कार्यालयाच्या मूळ संवर्गातील प्रतिनियुक्तीने इतरत्र कार्यरत असणारे अधिकारी / कर्मचारी तसेच सदर कार्यालयात इतर संवर्गातून उसनवारी तत्वावर प्रतिनियुक्तीने कार्यरत असणारे अधिकारी / कर्मचारी यांचा मुख्यमंत्री सुकर्मी पुरस्कार योजनेसाठी विचार करण्यात येऊ नये. उदा. मंत्रालयीन संवर्गातील कक्ष अधिकारी हा क्षेत्रीय कार्यालयात प्रतिनियुक्तीने कार्यरत असल्यास संबंधित कक्ष अधिकारी ज्या आर्थिक वर्षी प्रतिनियुक्तीने क्षेत्रीय कार्यालयात कार्यरत होता, त्या आर्थिक वर्षाचे गुणांकन करताना संबंधित कक्ष अधिकाऱ्याचा या पुरस्कारासाठी विचार करण्यात येऊ नये. तसेच उपजिल्हाधिकारी संवर्गातील अधिकारी प्रतिनियुक्तीने मंत्रालयात कार्यरत असल्यास, ज्या आर्थिक वर्षी प्रतिनियुक्तीने मंत्रालयात कार्यरत होता, त्या आर्थिक वर्षाचे गुणांकन करताना संबंधित उपजिल्हाधिकारी यांचा या पुरस्कारासाठी विचार करण्यात येऊ नये.

२) बदलीने कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांचा ते ज्या मूळ संवर्गात कार्यरत आहेत, त्या मूळ संवर्गाच्या मुख्य कार्यालयाने मुख्यमंत्री सुकर्मी पुरस्कार योजनेनुसार त्यांचे मुल्यांकन करून पुरस्कार्थी निवडीची कार्यवाही करावी. **उदा.** जिल्हा परिषदेतील उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे सदर पुरस्कारासाठी मुल्यांकन ग्रामविकास विभागाने करावे, नगर रचनाकार या संवर्गाचे सदर पुरस्कारासाठी मुल्यांकन नगर विकास विभागाने करावे, लेखा व वित्त अधिकारी या संवर्गाचे सदर पुरस्कारासाठी मुल्यांकन वित्त विभागाने करावे वगैरे.

३) तथापि, ज्या कार्यालयात **तांत्रिक स्वरूपाचे कामकाज पाहण्यासाठी** तांत्रिक संवर्गातील अधिकारी/ कर्मचारी **बदलीने कार्यरत असतात** व त्यांच्यासाठी **काही पदे राखून ठेवण्यात येतात** व संबंधित तांत्रिक अधिकारी/ कर्मचारी यास तांत्रिक कामकाजासोबतच संबंधित कार्यालयातील **समान वेतन श्रेणीच्या पदनामाचे इतर कामकाज देखील करावे लागते**, अशा बदलीने कार्यरत तांत्रिक अधिकारी / कर्मचारी यांच्या बाबतीत ते ज्या कार्यालयात कार्यरत

आहेत, त्या कार्यालयात त्यांचा पुरस्कारासाठी विचार करण्यात यावा. **उदा.** सह निबंधक, सहकारी संस्था हे बदलीने मंत्रालयीन संवर्गातील अवर सचिव या पदनामाने सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागात कार्यरत असून ते तांत्रिक कामकाजासोबतच अवर सचिव पदाचे कामकाज पाहतात, कार्यकारी अभियंता संवर्गातील अधिकारी हे बदलीने मंत्रालयीन संवर्गातील अवर सचिव या पदनामाने जलसंपदा विभागात कार्यरत असून ते तांत्रिक कामकाजासोबतच अवर सचिव पदाचे कामकाज पाहतात.

(ब) मंत्रालय स्तरावर या योजनेच्या अंमलबजावणीसाठीच्या मार्गदर्शनपर सूचना:-

मंत्रालयातील काही कार्यासनांचे कामकाज विशिष्ट प्रकारचे असल्यास अशा कार्यासनासाठी संबंधित प्रशासकीय विभागाने त्या कार्यासनाचे कामाचे स्वरुप विचारात घेऊन त्या आधारे या योजनेच्या संदर्भाधीन शासन निर्णयातील परिशिष्ट अ-२ मधील संबंधित संवर्गाच्या उद्दिष्टनिष्ठ बाबीतील अ.क्र.२ येथील निकष नव्याने निश्चित करून त्यासाठी अ.क्र.२ येथील कमाल गुणांच्या मर्यादेत गुणांकन ठरवून त्याप्रमाणे मुल्यांकन करण्याची कार्यवाही करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५०८१५०४३८१३०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Geeta Rahul Kulkarni

Digitally signed by Geeta Rahul Kulkarni
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=87e2e317e0d978442ac6b599d6a0abcf73fe717ee52994443a8509075101cc93, serialNumber=92d474843b842720200d1a10946d5fc9348b9450f867605a47d177207c9bd384, cn=Geeta Rahul Kulkarni
Date: 2018.05.08 15:05:36 +05'30'

(गीता कुलकर्णी)
उप सचिव (सेवा), महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३. सर्व मा.मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, विधानभवन, मुंबई,
५. सर्व मा.संसद सदस्य, /मा. विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य,
६. मा. मुख्य सचिव,
७. सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
८. सर्व मंत्रालयीन विभाग (आस्थापना),
त्यांनी हे आदेश सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावे.
९. *प्रबंधक, मूळ शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,

१०.*प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
११.*प्रबंधक, लोक आयुक्त व उपलोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१२.*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१३.*सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा) मुंबई,
१४.*सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधान परिषद) मुंबई,
१५.*राज्य निवडणूक आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई,
१६.*सचिव, राज्य माहिती आयोग, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई,
१७.*महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई.
१८. *महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा परीक्षा) महाराष्ट्र, मुंबई,
१९.*महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, नागपूर,
२०.*महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा परीक्षा) महाराष्ट्र, नागपूर,
२१.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,मुंबई (प्रसिध्दीकरिता ५ प्रती)
२२.ग्रंथपाल , महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ग्रंथालय, सहावा मजला, विधान भवन, मुंबई ४०० ०३२ (१० प्रती)
२३.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२४.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
२५.मुख्य लेखापरीक्षक (निवासी लेखे), कोंकण भवन, नवी मुंबई,
२६.सर्व विभागीय आयुक्त
२७.सर्व जिल्हाधिकारी
२८. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,